श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>नारळ लिलाव</u>

'श्री' च्या चरणी अर्पण केलेल्या नारळांचा (अंदाजे संख्या ४० हजार) लिलाव करणेत येत आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी दि.२८/१२/२०१५ रोजी सायं. ५.वा. पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज व अनामत रक्कम रू. १०,०००/– डी.डी./रोख स्वरुपात संत तुकाराम भवन येथे भरणे आवश्यक आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व लिलाव फॉर्म संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

क्र.अन्नछत्र विभाग/कावि/१०१/२०१५ दि.१७/१२/२०१५

सही xxx
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६–२२३५५०,
९४२२०१५६९१, ९८६०४४०९६०)

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

नारळ लिलाव

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. मालाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशिल | अंदाजे संख्या |
|---|---|---|
| १ | पाण्याचा नारळ | ३५ हजार |
| २ | बिनपाण्याचा नारळ | ५ हजार |

२. नमूना लिलाव फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. लिलाव फॉर्म भरून दि.२८/१२/२०१५ सायं. ५.००वा. पर्यंत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले फॉर्म विचारात घेतले जाणार नाहीत.

३. लिलाव फॉर्म सोबत अनामत रक्कम रू. १०,०००/— चा कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. सादर करणे आवश्यक आहे. लिलाव फॉर्म व अनामत रकमेचा डि. डी. किंवा पावतीची झेरॉक्स प्रत सिलबंद पाकिटात दि.२८/१२/२०१५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. **सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रं. व नारळ लिलाव फॉर्म असे नमुद करणे आवश्यक आहे.** सिलबंद लिलाव फॉर्म दि.२८/१२/२०१५ रोजी सायं. ०५.०० वा. संत तुकाराम भवन येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदारांना त्यावेळी इतर ठेकेदाराने नमुद केलेल्या दरांपेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या ठेकेदाराने जास्तीत जास्त दर नमुद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजुर करण्यात येईल.

४. ज्याचे नावे लिलाव मंजुर होईल त्यांनी लिलावाची होणारी २५% रक्कम त्याच दिवशी भरणा केली पाहिजे आणि उर्वरीत ७५% रक्कम पुढील पंधरा दिवसात भरून माल उचलणे आवश्यक आहे.

५. मुदतीत रक्कम भरली नाही अथवा माल उचलला नाही तर सदरचा लिलाव रद्द केला जाईल व अनामत रक्कम व २५% रक्कम जप्त करण्यात येईल.

६. लिलावातील माल अन्नछत्र विभाग, संत तुकाराम भवन, पंढरपूर या ठिकाणी दि.१९/१२/२०१५ ते दि. २७/१२/२०१५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

७. लिलाव मंजुर झालेनंतर लिलाव धारकांने स्वत:चे मजुर व वाहन लावून मंदिर समितीचे प्रतिनिधी समोर माल उचलणेचा आहे.

८. नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसंन्स/राष्ट्रीय बॅंकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच लिलावाचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

९. रहिवासाच्या पुराव्यासाठी स्वत:चे नावचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. प्रशासकीय व अन्य कारणास्तव लिलाव प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

११. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

———————‘‘————————

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

<u>नारळ लिलाव फॉर्म</u>

दिनांक    /    /२०१५

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः– ------------------------------

अर्जदाराचे पूर्ण नाव :– ------------------------------

पूर्ण पत्ता :– ------------------------------
------------------------------

मोबाईल कं.:– ------------------------------

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दिनांक १८/१२/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी, सोलापूर वर्तमानपत्रातील समितीचे 'श्री' च्या चरणी अर्पण केलेल्या नारळांची लिलावाची जाहिरात वाचली असून मला सदर लिलावात सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू. १०,०००/– रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या लिलावाबाबतच्या मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

१. अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बॅकेचे नांव, डी.डी. कमांक व दिनांक (सोबत डि.डि जोडला आहे.)
------------------------------------------------------------
२. अनामत रक्कम रोख भरली असल्यास पावती कमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)
------------------------------------------------------------
३. सोबत ओळखीचा पूरावा म्हणून --------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

४. सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून --------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

२/– माझा नारळाचा खरेदीचा दर मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ. क. | मालाचा तपशिल | किमान बोलीची किंमत (रू.) प्रति नग | ठेकेदाराने खरेदीसाठी नमुद केलेली जास्तीतजास्त किंमत प्रतिनग रू. |
|---|---|---|---|
| १ | पाण्याचा नारळ | रू.७/– (०१ नग) | |
| २ | बिनपाण्याचा नारळ | रू.४/– (०१ नग) | |

सदरच्या मी नमुद केलेल्या दराने नारळ खरेदी करण्यास बांधील राहील.

आपला विश्वासू,

(नाव व सही)